# ‘सेन्सेक्सचा प्रवास ४० हजार अंशांच्या दिशेने’

**सकाळ वृत्तसेवा**

पुणे, ता. २३ : "केंद्र सरकारचे उद्योगांना अनुकूल आर्थिक धोरण, दरडोई उत्पन्नात होत असलेली वाढ व जागतिक बाजारपेठेत भारताला उपलब्ध होत असलेल्या संधींमुळे पुढील तीन वर्षांत (२०१५-१६ पर्यंत) शेअर बाजाराचा सेन्सेक्स (निर्देशांक) ४० हजार अंशांपर्यंत पोचेल," असा अंदाज प्रिसिजन इन्व्हेस्टमेंट सर्व्हिसेसचे संचालक किरण जाधव यांनी येथे व्यक्त केला.

गणेश कला-क्रीडा मंच येथे आयोजित करण्यात आलेल्या गुंतवणूकदारांसाठीच्या जनजागृती शिबिरात श्री. जाधव यांनी शेअर बाजाराच्या आगामी वाटचालीबाबत भाष्य केले. शेअर बाजाराने तेजीची लय पकडली आहे, असे सांगून ते म्हणाले, "निर्देशांकाचे (सेन्सेक्स) पुढील उद्दिष्ट ४० हजार अंश असून, ते वर्ष २०१५-१६ मध्ये गाठले जाण्याची शक्यता आहे." या भाकितामागची तांत्रिक कारणेही त्यांनी स्पष्ट केली.

ते पुढे म्हणाले, "अमेरिकेतील परिस्थिती अद्यापही पूर्वपदावर आलेली नाही. युरोपीय देशही आर्थिक अडचणीत आहेत. चीनमध्येही सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे जगातील भांडवलाचा ओघ भारताकडे वळू शकतो. देशाच्या दरडोई उत्पन्नातही चांगली वाढ होत आहे. त्याचा सकारात्मक परिणाम शेअर बाजारावर होईल."

"रिटेलसह विमा, हवाई वाहतूक, प्रसारमाध्यमे आदी विविध क्षेत्रांत केंद्र सरकारने थेट परकी गुंतवणुकीला (एफडीआय) परवानगी दिली आहे. अनुदानाच्या प्रश्नावरही तोडगा काढण्याचा सरकारचा प्रयत्न दिसतो आहे. त्याचा अर्थव्यवस्थेला फायदा होणार आहे. त्याचप्रमाणे पेट्रोल, डिझेलच्या किमती आंतरराष्ट्रीय दरांशी निगडित झाल्या आहेत. आर्थिक सुधारणांची ही प्रक्रिया अशीच सुरू राहिली, तर उद्योगांमध्ये स्थिरतेचे वातावरण निर्माण होईल व अर्थव्यवस्था सुदृढ होईल," असे भाकीत शेअर बाजारातील तज्ज्ञ व फंडामेंटल ॲनालिस्ट अविनाश गोरक्षकर यांनी या वेळी व्यक्त केले.

शेअर बाजाराचा निर्देशांक वाढणार असला, तरी सरसकट सर्व शेअरचे भाव वाढणार नाहीत. बॅंकिंग, ऑटो व फार्मा यांसारख्या काही निवडक क्षेत्रातील चांगली प्रगती करणाऱ्या कंपन्यांच्या शेअरचे भाव वाढताना दिसतील. शेअर बाजारात गुंतवणूक करताना संबंधित कंपनीचा अभ्यास करूनच निर्णय घेतला पाहिजे, असेही या वेळी सांगण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एकनाथ खेडकर उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात गुंतवणुकीचे आणि गुंतवणुकीसाठी लागणारे मार्गदर्शन याचे महत्त्व स्पष्ट केले.

या वेळी 'प्रिसिजन इन्व्हेस्टमेंट सर्व्हिसेस'च्या नव्या संकेतस्थळाचेही उद्घाटन करण्यात आले. या संकेतस्थळाच्या माध्यमातून गुंतवणूकदारांसाठी अनेक सेवा-सुविधा पुरविण्यात येणार आहेत. श्री. आशिष केळकर यांनी या सेवांविषयी माहिती दिली. मकरंद विपट यांनी आभार मानले.